# प्रकरण ३ रे

## संघाचा परिचय

### ३.१) ऐतिहासिक पार्श्वभुमी :-

निपाणी भाग सहकारी दुध उत्पादक संघ लि, निपाणी या सहकारी दुध संघाची स्थापना १६-११-१९७३ रोजी झाली आणि २६-१२-१९७३ रोजी प्रत्यक्ष कामास सुरवात झाली. निपाणी भागचे तत्कालीन आमदार रघुनाथरावजी कदम यांचे मार्गदर्शन व सहकार्यामुळे आणि खडकलाटचे के.रामचंद्र परशराम यादव के. महावीर पायगोंडा पाटील मांगुर, के.रंगराव बाबाजी पाटील कुर्ली तसेच वसंतराव तात्यासाहेब मोहिते इ.च्या अथक प्रयत्नामुळे तालुका पातळीवरील दुध संघाची नोंदणी करण्यात आली. महावीर पायगोंडा पाटील (मांगुर) हे संस्थेचे चीफ प्रमोटर होते. निपाणी शहर व निपाणी शहरापासुन ११ मैल त्रिजेत येणा-या गावातुन भाग भांडवल गोळा करण्याचे काम वरील मंडळींनी केले.

१९७३ च्या पुर्वी निपाणी व निपाणी भोवतालच्या सर्व खेड्यातुन व्यक्तीगत पातळीवर गवळी लोक दूधाचे संकलन करीत असत. या सर्व गवळी लोकांना मध्यवर्ती ठिकाण म्हणजे निपाणी शहर होय. त्यावेळी निपाणीतील सर्वात जास्त दुध स्वीकारणारे गि-हाईक म्हणजे निपाणी मधील हाटेल, स्वीटमार्ट आणि

घरोघरी दूध विकत घेणारी कुटुंबे इ.

निपाणी शहराच्या पश्चिमेकडील खेड्यामधील दूध गवळी व स्वतः स्त्रीया खेड्यातुन दूध संकलन करुन निपाणी शहरामध्ये पोहचवित असत. दूधाचे संकलन पूर्णपणे व्यक्तिगत गवळी लोकाच्यावर अवलंबुन असल्यामुळे दूध उत्पादकाना त्यांच्या दूधाचा दर हा अगदीच कमी मिळत असे. दूध उत्पादकाना योग्य किंमत मिळत नव्हती. दूधाची प्रत कमी करुन (पाणी घालुन) दूधाची विक्री होत असे. दूध व्यवसायाला चांगली हमीची बाजार पेठ नव्हती. व दूधाच्या प्रतिवर नियंत्रण नव्हते. मिळणारी दूधाची रक्कम सुध्दा पूर्ण हिशोबाने दिली जात नसे. या भागातील दूध व्यवसाय अनिश्चित होता. आणि दूध उत्पादकांची प्रचंड पिळवणूक होत होती.

१९७१ पुर्वीच्या दूध व्यवसायातील प्रमुख अडचणी खालील प्रमाणे होत्या.

१) दुध व्यवसायाला शाश्वत बाजार पेठ नव्हती.

२) दुध उत्पादकाना दूधाला योग्य दर मिळत नव्हता.

३) दूधाच्या प्रतमध्ये निश्चितता नव्हती.

४) दूधामध्ये पाणी भेसळ करण्याचे प्रमाण जास्त होते.

५) दुध संकलन करतेवेळी खोटया मापाचा वापर केला जात होता.

६) दुध उत्पादकाना दूधाचे बिल व्यवस्थीत मिळत नव्हते.

अशया प्रकारच्या समस्या निपाणी शहर व निपाणी परिसरातील कांही भाग यांच्यावर जानवत होत्या. यावर मात करण्यासाठी निपाणीचे आमदार रघुनाथरावजी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली व वसंतराव तात्यासाहेब मोहिते यांच्या सहकार्यामुळे निपाणी परिसराचा अभ्यास करुन, निपाणी हे मध्यवर्ती शहर निवडले गेले. व सहकारी तत्वावर चालणारी सहकारी दूध डेअरीची स्थापना सन १९७३ मध्ये केली गेली.

निपाणी व निपाणी परिसरातील खेडी महाराष्ट्रातील कागल हातकणंगले तालुक्या लगटच्या सीमेवर असल्याने तेथील विकसित झालेल्या दूध व्यवसायाचे फायदे व विकास या बाबतची माहिती निपाणी परिसरात समजल्यामुळे आपल्या ही भागात दूध व्यवसायासाठी चांगली बाजार पेठ मिळावी, व दूधाचे उत्पादन वाढवावे हा विचार पुढे आला. व सहकारी दूध डेअरीची स्थापना करण्यात आली.

सहकारी डेअरी स्थापन करण्यासाठी पुढील उदीष्टेय मान्य करण्यात आली.

१) उत्पादीत दूधाला चांगला दर मिळवून देणे.

२) संकलन झालेला दूधाला चांगली बाजारपेठ मिळवून देणे.

३) दूधाच्या प्रती नुसार दूध उत्पादकाना दूधाचा दर मिळवुन देणे

४) दूध बिलाचे हिशोब तंतोतंतकरुन या पुर्वी होणारे दूध उत्पादकांचे आर्थिक शोषन थांबविणे.

५) शेती या मुख्य व्यवसायास जोडधंदा म्हणून अस्तित्वात असलेल्या दूध धंदाची आणखी वाढ करणे.

६) दूधाचे संकलन व वितरण सहकारी संस्थेमार्फत करुन सहकारी चळवळ वाढीस लावणे.

७) ग्रामीण भागातील कांही बेकार लोकांना रोजगार उपलब्ध करुन देणे.

८) दूध व्यवसायाच्या विकासासाठी शासनाकडून आलेल्या सवलतीचा लाभ दूध उत्पादकाना मिळवून देणे.

९) दूध संकलनासाठी गावोगावी दूध संकलन केंद्रे उघडणे व दुग्ध व्यवसायाचा विकास करणे.

त्यावेळच्या संस्थापकानी या दूध सहकारी संघाची स्थापना करण्यासाठी तीन प्रकारचे सभासद ठरविण्यात आले होते. १) राज्यसरकार (२) दूध उत्पादक संस्था (३) व्यक्तिगत सभासद, व्यक्तीगत सभासदास रु २५/- भाग ठरविण्यात आले व दूध उत्पादक संस्था सभासदाना रु १००/- चे भाग ठरविण्यात आले. प्राथमिक अवस्थेत राज्य सरकारकडून कुठल्याही प्रकारचे भांडवल घेतले नाही. त्यावेळी संस्था सभासद संख्या ही २ च होती या संस्था सभासदाचे भाग भांडवल रु ११००/- एवढे होते

अ) लक्ष्मी दूध सोसायटी सदलगा रु. १०००/- रु. भाग भांडवल

ब) कुर्ली दूध उत्पादक संस्था रु १००/- भांडवल अशा प्रकारे

रु.११००/- भाग भांडवल हे संस्था सभासदाकडून घेण्यात आले होते.

व्यक्ती सभासदाची संख्या ७८६ होती. व त्यांच्या भाग-भांडवलाची रक्कम ही २१३७५/- एवढी होती व एकुण भाग भांडवल हे २२४७५/- रु होते. एकुण सभासद संख्या ७८८ एवढी होती.

पहिल्या दिवशीचे दूधाचे संकलन २४५ लिटर एवढे झाले. दुध संकलनाची सुरवात कार्यक्षेत्रातुन कुर्ली गांवातील शेतकरी दूध उत्पादक सहकारी संघ कुर्ली मार्फत श्री हलसिध्दनाथ मंदीर कुर्ली येथे झाली. पहिल्या वर्षी उत्पादन होणारे दुध हे ६.७ ते ७.३ फॅट पर्यंत होते. त्यामुळे दुध उत्पादकाना पहिल्या वर्षी बाजार पेठे पेक्षा १ रु जादा दर मिळाला. पहिल्या वर्षी संघाने प्रती लिटर १.७३ पैसे दर दिला. पहिल्या वर्षी २०० लिटर्सची स्थानिक विक्री वगळता उर्वरीत दुध शासकीय दूध योजना कोल्हापूर यांना पाठविले जात होते. शासकीय दूध योजना कोल्हापूर यांच्याकडुन प्रतीलिटर २.१८ पैसे असा दर मिळाला होता. या व्यतिरिक्त संघाच्या वहानातुन दूध संकलन करुन शासकीय दूध योजना कोल्हापूर यांचेकडुन प्रती लिटर १२ पैसे वहातुक व ४ ते ५ पैसे प्रतिलिटर बर्फ वापरासाठी मिळाले होते.

सुरवातीच्याकाळात दूधाचे संकलन भाडोत्री वहानातुन केले जात होते. नंतरच्या काळात दूध संकलनाची वाढ झालेने संघाने स्वता:च्या भांडवलातुन एक जुनी ट्रक खरेदी केली (एम. एच. एल.२५६)

संघाकडे उपलब्ध असलेले भाग भांडवल व निधी गाडीचा किंमती इतके नसल्याने त्यावेळच्या संस्थापक संचालकानी स्वता:कडील रक्कम संघाला डिपॉझीट म्हणुन दिली व ट्रक खेरेदी केली.

खरेदी केलेल्या ट्रकची किंमत ३२२०१/- इतकी होती.

अगदी सुरवातीच्या म्हणजे १९७३ चे संचालक मंडळात खालील मान्यवर लोक होते.

| | | |
|---|---|---|
| १. | विजयराव तात्यासो मोहिते | चेअरमन |
| २. | रघुनाथराव विठ्ठलराव कदम | संचालक |
| ३. | महावीर पायगोंडा पाटील | " |
| ४. | रंगराव बाबाजी पाटील | " |
| ५. | यशवंतराव गुंडू जाधव | " |
| ६. | धरमगोंडा रामगोंडा पाटील | " |
| ७. | श्रीकांत जैबू सौंदते | " |
| ८. | आप्पासो मल्लाप्पा खोत | " |
| ९. | बाळासो रामा कोणे | " |
| १०. | वसंतराव दत्तोबा वेंडके | " |
| ११. | रामचंद्रराव परशराम यादव | " |
| १२. | तुकाराम गणपती यादव | " |
| १३. | देवेंद्र पायगोंडा खोत | " |

सीमा भागातील निपाणी शहर व भोवतालच्या परिसरातील पहिली सहकारी तत्वावर चालणारी संस्था म्हणून या दूध संघाचा उल्लेख करता येईल. त्यावेळी चिक्कोडी तालुका व हुक्केरी तालुका या भागातून दूध संकलन केले जात होते.

कर्नाटकांतील सहकारी दूध व्यवसाय हा अविकसीत असल्यामुळे व हवे तेवढे कर्नाटक शासनाचे लक्ष नसल्यामुळे या भागातील दुध व्यवसाय खंडीत झालेला होता. त्यावेळच्या संचालक मंडळाने महाराष्ट्रातील विकसित दूग्ध व्यवसायाचा आणि कार्यालयीन सहकार्याचा व मार्गदर्शनाचा लाभ घेवून निपाणी परिसरात दूग्ध व्यवसायाचा विकास केला.

सुरवातीच्या काळामध्ये दूध धंदयामध्ये तज्ञ व कुशल कामगारांच्या अभावामुळे महाराष्ट्र शासनाकडील सहकारी दूध धंदातील तंत्रज्ञानाचा वापर त्यावेळच्या संचालक मंडळाने केला. सहकारी दूध धदयाच्या विकासासाठी शिबीरे आयोजित करणे कुशल तंत्रज्ञानाच्या मार्फत प्रचार व प्रत्यक्ष कामकाजाची माहिती देणे यासाठी बाहेरुन बोलाविलेल्या तंत्रज्ञाना संघानेच मोबदला दिला असल्यामुळे प्रशासकीय व व्यवस्थापकीय खर्च हा संघाकडून केला गेला. व त्यातुनच गावोगांवी दूध धंदयाबद्दल आकर्षन वाढत गेले.

सुरवातीच्या वर्षी संकलन झालेल्या दूधाला ४२०,१३८ रु दूध बिलाचे परिसरातील भागामध्ये वाटप झाले.

पहिल्या वर्षी दूध संकलन वितरण मिळकतीतुन व्यवस्थापकीय खर्च वजा जाता ७६०६ रु. निव्वळ नफा झाला.

३.२) संघाचे कार्यक्षेत्र :-

निपाणी भाग दूध उत्पादक सहकारी संघ लि,

निपाणी या दूध संघाच्या कार्यक्षेत्रात निपाणी व निपाणी परिसरातील कांही खेडी येतात. निपाणी हे मध्यवर्ती केंद्र गृहित धरून त्याच्या भोंवतालच्या ११ मैल त्रिजेतील सर्व खेड्यातुन सहकारी दूध संस्था स्थापन करणे व त्या वाढीस लावणे हे संघाचे प्रमुख कार्य आहे. या बाबतसंस्थेच्या सभासदांनी ठरविले प्रमाणे दूध संघाच्या कार्यक्षेत्रात निपाणी शहर व निपाणी शहराच्या अकरा मैल त्रिजेत येणारी सर्व खेडी येतात. संघाच्या नोंदणीच्या वेळी सहकार खात्याकडे त्यापध्दतीची मागणी केली होती. यातर्फे त्यानुसार सहकार खात्याने त्याला मंजुरी देताना ते मंजुर केले होते.

निपाणी भाग सहकारी दूध उत्पादक संघ हा चिक्कोडी तालुकातील पश्चिम भागात कार्यरथ आहे. कार्यक्षेत्राचा विचार केला तर चिक्कोडी व हुक्केरी तालुक्याचाकांही भाग व कागल तालुक्याचा कांही भाग या तीन तालुक्यापुरता मर्यादित आहे. एवढा भाग कार्यक्षेत्रात समाविष्ट असुन देखील धंदयाच्या वाढीच्या दृष्टीकोनातुन संघाने कार्यक्षेत्राच्या बाहेरील भागातुन दुधाचे संकलन केले आहे.

तसेच या भागातील दूध संकलन संस्था वाढलामुळे दूध संकलनात विभागणी झाली. व ज्या ज्या वेळी संघाचे दूध संकलन कमी झाले त्या त्या वेळी संघाने कार्यक्षेत्राबाहेरील दूध संकलन करून त्यादूधाचे वितरण संघाने केलेले आहे.

कर्नाटक सरकारचे सहकार खात्याकडुन घालुन दिलेल्या कार्यक्षेत्रातुन निपाणी भाग सहकारी दूध उत्पादक संघ आज तागायत दुध संकलन, वितरण. जनावरांच्या औषधांच्या सोयी, जनावारासाठी खाद्य पुरवठा, तसेच अन्य सामाजिक बांधिलकीची कामे सुरुवातीपासुन आज तागायत पर्यंत संघ करीत आहे.

या दूध संघाचे कार्यक्षेत्र मर्यादित असले तरी संघाचा व्याप वाढत आहे. त्यामुळे या दूध संघाकडे कार्यक्षेत्र वाढविण्याचा विचार येत आहे. हे कार्यक्षेत्र राज्य व प्रसंगी राज्या बाहेरील क्षेत्र संघाच्या कार्यक्षेत्रात घेण्याचा संघाचा विचार आहे.

३.३) संघाचे सभासद :-

संघ स्थापनेच्या विचाराला चालना मिळाल्यानंतर कर्नाटक सरकारच्या सहकार खात्याने घालुन दिलेल्या कार्यक्षेत्रातुन सभासद नोंदणी करण्याचे कार्य त्यावेळच्या संस्थेचे चिफ प्रमोटर व त्यांचे सहकारी यांनी गांवोगांवी दूध उत्पादकांच्या भेटी घेवून सहकार म्हणजे काय ? व सहकारी दूध विकास म्हणजे काय ? याबद्दलचे मार्गदर्शन व सहकाराचे महत्व त्याचे फायदे पटवून दिले. सहकाराच्या माध्यमातुन दूध धंदयांचा विस्तार ही बाब सर्वांना समजावून दिली संघाचे सभासद होण्यासाठी सर्वांना प्रवृत्त केले. व त्यावेळी व्यक्ती सभासदाना एका भागाची किंमत रु २५/- अशी आकारली व घालुन दिलेल्या कार्यक्षेत्रातुन भाग भांडवल गोळा केले.

संघाचे सभासद तीन गटात विभागलेले आहेत.

१) राज्यसरकार

२) दूध उत्पादक संस्था

३) व्यक्तिगत सभासद

सुरवातीच्या काळात राज्य सरकारकडून कोणत्याही प्रकारचे सहाय्य व सभासदत्व न स्विकारता. त्यावेळच्या संचालकानी दूध उत्पादक संस्था व व्यक्तिगत सभासद यांच्याकडूनच भाग भांडवल गोळा केले. कारण सुरवातीच्याकाळात शासनाकडून संस्थाना भाग भांडवल पुरविण्याची योजना सरकार कडे नसल्यामुळे संघाने व्यक्तिगत सभासद व दूध उत्पादक संस्था यांच्याकडूनच भाग भांडवल गोळा केले.

१९७३ मधील तत्कालीन संचालक मंडळाच्या प्रयत्नाने सभासद ७८८ पर्यंत पोहचले. या मध्ये ब वर्ग (दूध उत्पादक सहकारी संस्था ) सभासदाची संख्या २ व क वर्ग सभासदाची संख्या ७८६ एवढी होती. एकुण भांगभांडवल २२४७५/- रु एवढे होते. संस्थेचे सभासदासंदर्भातील उपनियम खालील प्रमाणे आहेत. संस्थेच्या उपनियमात सभासदांचे वर्गीकरण हे अ वर्ग ब वर्ग व क वर्गात केले आहे.

१) सुरवातीच्या काळात अ वर्ग सभासद संघाने घेतले नव्हते.

२) या सहकारी दूध संस्थेचे सभासद वयक्तिगत असल्यास किंवा क वर्गातील असल्यास त्याचे वय सभासदास पात्र होण्यास १८ असावे.

३) सभासद व्यक्ती दिवाळखोर नसावी व कोणत्याही प्रकारची शिक्षा झालेली नसावी त्यांचे वर्तन चांगले असावे.

४) ब वर्ग संस्था सभासदांच्या बाबतीत दूध उत्पादक संस्था दूध संकलन करुन त्या दूधाची संघास विक्री करणारी व संघाचे नियम व अटी पाळणारी असावी.

५) सभासद संस्थेने संकलन होणारे दूध संघाला पाठविले पाहिजे असे संस्थेच्या उपनियमात नमूद आहे. तरच संस्थेला सभासदत्व देण्यात येते.

६) या व्यतिरिक्त संघाकडे नाममात्र सभासदांची तरतुद आहे. नाममात्र सभासद होण्यासाठी संघाकडे प्रवेश फी रु. १ भरल्यानंतर त्या व्यक्ती अथवा संस्था नाम मात्र सभासद होतात. नाममात्र सभासदाना संस्थेच्या दैनंदिन व्यवहारात, निवडणूकीतील व्यवहार निवडणूकीत मतदान वगैरे करण्याचा अधिकार नाही. साधारणपणे नाम मात्र सभासद हे संघाशी होणारे व्यवहार व धंदा या बाबतीत निगडीत असणा-या व्यक्ती व संस्थेचे केले जाते.

संस्थेचे उप नियम पाच, सहा (आय) सात, आठ, दहा, अकरा प्रमाणे

१) सभासद नोंदणी करते वेळी संघाच्या कार्यक्षेत्रातील दूध उत्पादकाने संघाकडे सभासद होणा-या बाबतचा अर्ज सचीवाकडे सादर केल्यानंतर

२) सभासदाची व्यवहाराची मर्यादा म्हणजेच नफा तोटा होणारी मर्यादा त्याने घेतलेल्या भागाच्या किंमती एवढीच राहील.

३) संघाकडे सहकार्याची भावना न ठेवता संघाच्या हितास बाधा आणणारे वर्तन अथवा संघाकडून केला जाणारा धंदा यामध्ये आर्थिक नुकसान पोहचविणारे व्यक्तीचे सभासदत्व रद्द ठरविण्याचा अधिकार संघास दिला असून तो उपनियमामध्ये समाविष्ठ केला आहे. मात्र सभासद रद्द करताना पुरेसे कारण जरुरीचे आहे.

संघाच्या सभासद संख्येमध्ये गेल्या १५ वर्षांमध्ये जे बदल झाले त्याचा तपशील तक्ता क्र. ३. १ मध्ये दिला आहे.

## तक्ता क्र. ३. १

### संघाचे सभासद

| वर्ष | संघाचे सभासद | | | एकूण सभासद |
|---|---|---|---|---|
| | अ वर्ग | ब वर्ग | क वर्ग | |
| १९७४-७५ | - | ३ | १२६७ | १२७० |
| १९७५-७६ | - | ३ | १३४३ | १३४६ |
| १९७६-७७ | - | ३ | १३३२ | १३३५ |
| १९७७-७८ | - | ४ | १३०९ | १३१३ |
| १९७८-७९ | - | ५ | १२८५ | १२९० |
| १९७९-८० | - | ५ | १२७८ | १२८३ |
| १९८०-८१ | १ | ६ | १२६९ | १२७६ |
| १९८१-८२ | १ | ६ | १२६८ | १२७५ |
| १९८२-८३ | १ | ८ | १५७७ | १५८६ |
| १९८३-८४ | १ | ८ | १६७८ | १६८७ |
| १९८४-८५ | १ | ८ | १६७४ | १६८३ |
| १९८५-८६ | १ | ९ | १६९० | १७०० |
| १९८६-८७ | १ | १० | १७२४ | १७३५ |
| १९८७-८८ | १ | १० | १७२४ | १७३५ |
| १९८८-८९ | १ | ११ | १७२५ | १७३७ |
| १९८९-९० | १ | ११ | १७२६ | १७३८ |

आधार:-

संस्थेचे वार्षिक अहवाल व संस्थेचे ऑडीट रिपोर्ट .

सभासदाचे वर्गीकरण :-

अ. वर्ग - राज्य सरकार

ब वर्ग - दुध उत्पादक संस्था

क वर्ग - व्यक्तीगत सभासद

संस्थेच्या स्थापनेच्या वेळी ब वर्गातुन दोन व क वर्गातुन ७८६ अशी सभासद संख्या होती. एकुण सभासद७८८ इतके होते. दुस-या वर्षी म्हणजेच १९७३-७४ मध्ये संघाचे सभासद ब वर्गातील ३ व क वर्गातील ७८५ असे होते. एकुण सभासद पुर्वी इतकेच कायम होते. सुरवातीला राज्यशासनाकडून सभासद स्वीकारले नव्हते.

इ. स.१९७५-७६ मध्ये संघाचे एकुण सभासद हे १३४६ एवढे होते. १९७५ पासुन १९८१-८२ पर्यंत संघाच्या एकुण सभासदामध्ये घट झालेली दिसुन येते. या काळात कांही सभासदांच्या मृत्यु व निपाणी भागात कांही नवीन दूध उत्पादक संस्था काढल्या गेल्या त्यामुळे संघाचे सभासदत्व कमी झालेले आहे.

इ. स.१९८० -८१ पासुन संघाने राज्य सरकारचे सभासदत्व स्वीकारले आहे. १९८२-८३ पासुन संघाच्या एकुण सभासदामध्ये वाढ होत आहे. याकाळात ब वर्गातुन म्हणजेच दूध उत्पादक संस्थेचे सभासदत्व वाढत आहे.

१९८९-९० या वर्षी संघाचे एकुण सभासद अ वर्ग (राज्य सरकार) एक ब वर्ग ( दुध उत्पादक संस्था) ११ व क वर्ग (व्यक्तीगत सभासद) १७२६ असे मिळुन एकुण सभासद हे १७३८ एवढे होते.

३.४) संघाचे व्यवस्थापन:-

या संघाचे नांव चिक्कोडी तालुका पश्चिम भाग दूध उत्पादक सहकारी संघ लि, निपाणी असे सुरवातीच्या काळात होते व त्याच नांवाने संस्थेची नोंदणी झाली. सुरवातीच्या काळात संघाचे संचालक मंडळ १३ लोकांचे होते. त्यामध्ये दोन व्यक्ती ब वर्ग संस्था-गटातुन व ११ व्यक्ती क वर्ग व्यक्ती सभासदातुन असे संचालक मंडळाची व्याप्ती होती. या व्यतिरिक्त संघाच्या उपनियमामध्ये मध्यवर्ती वित्तसंस्थेचा एक प्रतिनिधी ( बी. डी.सी.सी) व राज्य सरकारकडून एक प्रतिनिधी अशी व्याप्ती होती. मात्र राज्य सरकार व वित्तसंस्था यांच्यामधुन प्रतिनिधी संघाने बोलाविले नाही. त्यामुळे त्यांची संचालक मंडळात समाविष्टता झालेली नाही.

दिनांक १७-१०-७८ रोजी संघाच्या नियमावळीत बदल करून संघाचे नांव निपाणी भाग दूध उत्पादक सहकारी संघ लि, निपाणी असे करण्यात आले. याच वेळी बोर्ड आॅफ डायरेक्टर्स (संचालक मंडळ) मध्ये ही बदल करण्यात आला सध्या तो पुढील प्रमाणे.

दुध उत्पादक संस्था गटातुन २ उमेदवार व व्यक्तीगटातुन ९ उमेदवार असे ११ लोकांचे संचालक मंडळ करण्यात आले. या संचालक मंडळातुन एक व्यक्तीची अध्यक्ष म्हणुन निवड करण्याची तरतुद संघाच्या उप नियमांत आहे. उपाध्यक्षाची निवड संस्थेच्या उपनियमात नाही.

संस्थेचे उपनियम क्रमांक २५ प्रमाणे.,

संघाच्या अध्यक्षानी संघाच्या दैनंदिन कामकाजावर नियंत्रण ठेवुन एकुण कामकाज पहाण्याची तरतुद आहे. संघाचा अध्यक्ष हा संघाचा सर्वाधिकारी आहे. त्याला त्याचा कामाचा मोबदला दिला जात नाही. संस्थेचे उप नियम क्रमांक २६ प्रमाणे,

संघाच्या अध्यक्षांनी आपले सह संचालक मंडळ यांच्याशी कामकाजा बाबतीत विचार विनिमय व सल्लामसलत करुन संस्थेच्या कामकाजाचे निर्णय घेणेचे ठरत असते.

संघाचा मासिक ताळेबंद नफा तोटा, पत्रक, दूध तुट वाढ व इतर अनुषांगिक कामाच्या बाबतीत नोंद घेणे मासिक बैठकी घेवून खर्चास मंजुरी, नवीन ध्येय धोरणास मंजुरी देणे इत्यादी बाबतचे निर्णय घेण्याच्या संदर्भातील कामकाजातचे स्वरुप स्पष्ट केले आहे.

प्राथमिक अवस्थेमध्ये संघाच्या संचालक मंडळाची निवड प्रत्येक वर्षाला होत असे त्यावेळी संघाचा सभासद अथवा सचिव यांचे कडून निवडणूक कामकाज पाहिले जात असे. अलिकडच्या १० वर्षापासुन संचालक मंडळाच्या निवडणूकीसाठी सहकार खात्याकडून निवडणूक अधिकारी नेमला जातो. संघाचे सचिव व इतर सेवक वर्ग यांच्या मदतीने निवडणूकीचे कामकाज निवडणूक अधिका-याकडून पाहिले जाते. यामध्ये निवडणूक अधिका-यांच्या निर्णय अंतिम मानला जाऊन तो बंधनकारक ठरतो.

संचालक मंडळाची निवड /निवडणूक नवीन संचालक मंडळ सत्तेवर आल्यानंतर १५ दिवसांच्या आत सात दिवसाची आगाऊ नोटीस संचालक मंडळाने देऊन अध्यक्षाची निवड केली जाण्याची तरतुद कामकाजा मध्ये आहे.

बदल झालेल्या कायदाप्रमाणे संघाचे संचालक मंडळ तीन वर्षातुन एकदा निवडावयाचे असुनत्यातील अध्यक्षाची निवड दर १२ महिन्यातुन एकदा करावयाची ठरली आहे. उपनियम २० अ मधील दुरुस्तीप्रमाणे संचालक मंडळाच्या निवडणूकीचे कामकाज कर्नाटक सहकारी कायदा व संघाचे उपनियम या दोन्ही बाबी विचारात घेवून संचालक मंडळ निवडले जाते. संचालक निवडते वेळी एक व्यक्ती एक मत या सहकारी तत्वाधिकाराचा वापर केला जातो. निवडणूक नियमानुसार निवडणूक कार्यक्रम प्रती तीन वर्षांनी जाहिर करुन सभासदातील इच्छुक उमेदवाराकडुन अर्ज स्वीकृत करुन निवडणूक जाहीर केली जाते.

या निपाणी भाग दूध उत्पादक सहकारी संघ लि, निपाणी याचे एक महत्वाचे वैशिष्ट म्हणजे संस्थेच्या इतिहासात आजपर्यंत निवडणूक झालेली नाही. आज तागायत संचालकाची व अध्यक्षाची निवड ही बिन विरोध झाली आहे.

वरील प्रमाणे ठरविलेल्या धोरणाची अमलबजावणी करण्यासाठी दुध संघाकडे सचिव यांची नेमणूक कायदयाबर हुकुम अम्मलबजावणीसाठी केलेली आहे.

सचिवच्या मदतीस लेखापाल ,खजीनदार कारकुन इ. सेवक वर्ग असतो. संघाचे दैनंदिन कामकाज व्यवस्थीत पार पाडण्यासाठी

विविध विभागासाठी पगारी विभागीय व्यवस्थापकांची नेमणूक केली आहे आणि त्यांच्याकडे त्याचा कामकाजांची जबाबदारी दिली आहे. यामध्ये दैनंदिन जमाखर्चाची नोंद ठेवणे संघाकडील मालमत्तेच्या सांभाळ करणे मालाची खरेदी विक्री करणे इत्यादी कामकाजाचा समावेश आहे. दिलेल्या कामाची जबाबदारी संबधीताकडुन पार पाडुन घेण्याची जबाबदारी सचिवाची असते. संचालक मंडळ व सभासद यांच्यामधील महत्वाचा दुवा म्हणून सचिवाचे कामकाज महत्वाचे आहे.

समारोप:-

निपाणी भाग सहकारी दूध उत्पादक संघ लि, निपाणी या दूध संघाची स्थापना झालेपासुन हा संघ दूधसंकलन व दूध वितरणाचे कार्य व्यवस्थीत करीत आहे. उपनियमामध्ये घालुन दिलेल्या कार्यक्षेत्रात दूध व्यवसायाचे कार्य उत्तमरित्या पार पाडीत आहे. निपाणी व निपाणी परिसरात या संघामुळे दूध उत्पाद वाढीची प्रेरणा मिळाली आहे. दूध उत्पादकाना दूधाची योग्य प्रतवारीनुसार किंमत मिळत आहे. निपाणी मधील सहकारी तत्वावर चालणारा पहिला दूध संघ म्हणून या संघाचा उल्लेख करता येईल व या दूध संघानेच सहकारी दूध व्यवसायाचा पाया घातला असे म्हणता येईल.